महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद
(विद्या परिषद)
इयत्ता : आठवी

---

# समजपूर्वक वाचन

मजकुराचा प्रकार :- **अर्ज**

दि. २ डिसेंबर २०१५

प्रति

मा. मुख्याध्यापक,
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रामपूर,
ता.जि. सांगली.

विषय :- बुद्धिबळ स्पर्धेत सहभागी होण्याबाबत

अर्जदार :- सदाशिव परांजपे

मा. महोदय,

मी आपल्या शाळेतील आठवीचा विद्यार्थी आहे. शैक्षणिक वर्ष २०१५-२०१६ मध्ये दि. २५ जाने. २०१६ ला होत असलेल्या तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत मला सहभाग घ्यावयाचा आहे.

माझी बुद्धिबळ स्पर्धेची तयारी झालेली आहे. मी नियमित सराव करीत आहे. माझा दैनिक अभ्यासपण चांगला आहे.

तरी, वरील बुद्धिबळ स्पर्धेसाठी माझी निवड करावी, ही नम्र विनंती.

आपला आज्ञाधारक विद्यार्थी,
संदीप जोशी

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्या परिषद)

इयत्ता : आठवी

---

**प्रश्न :-**

१) अर्ज कोणी सादर केला ?

२) तालुकास्तरीय स्पर्धा किती तारखेला आहे ?

३) अर्जाचा विषय कोणता ?

४) परवानगी कोणाकडे मागितली आहे ?

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्या परिषद)

इयत्ता : आठवी

---

मजकुराचा प्रकार :- **कविता**

कवी :- **शंकर वैद्य**

**कवडसा**

भिंतीवर एक कवडसा
मजसाठी थांबायचा
रंगावे बाळ तसा तो
हळु सरकत मग जायाचा

कधी चांदणरात्रीसुद्धा
तो कौलातून यायाचा
झुळझुळीत रेशीमवस्त्रे
अन गुलुगुलु बोलायाचा

मी गुपचुप बोले त्याशी
तो हसेरुसे मज बघुनी
त्या अमुच्या खेळामधुनी
मज सुचली सुंदर गाणी

घर नवे जाहले तेव्हा
हो बंद तयाची वाट
यामुळेच घडली अमुची
कायमची ताटातूट

मी शोधित असता त्याला
स्वप्नात कधी तो येतो
तो असे बोलतो काही
की गीत नवे मी लिहितो

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्‌या परिषद)

इयत्ता : आठवी

---

**प्रश्न :-**

१) कवितेत कशाचे वर्णन केले आहे?

२) कवडशाची तुलना कोणाशी केली आहे?

३) कवी व  कवडसा यांची ताटातूट केव्हा झाली?

४) कवडसा घरात कोठून यायचा?

५) कवीला नवे गीत केव्हा सुचते?

६) कवडसा या कवितेचे कवी कोण?

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्या परिषद)

इयत्ता : आठवी

---

मजकुराचा प्रकार :- **गणिती भाषा**

लेखिका :- सुचित्रा साठे

मजकूर :- **आता भेट सोळाशी**

"आजी, आज या वर्षातला शेवटचा रविवार. पुढच्या रविवारी आपण २०१६ मध्ये असणार." ओंकारला खूप गंमत वाटत होती.

पंधरा आकडा खूप ओळखीचा झाला होता. आता पंधरा साल भूतकाळात जमा होणार. गंधारला आलेलं काळाचं भान त्याच्या बोलण्यातून डोकावलं.

सगळ्यांना 'सोळा' या आकड्याचे वेध लागलेले बघताच त्या 'सोळा' ला घट्ट पकडून ठेवत आजी म्हणाली, "आता आपली सोळाशी गट्टी होणार. सोळा म्हटलं की आणखी कोणकोणत्या गोष्टी आठवतात, विचार करा बघू."

"आम्हाला काहीच आठवत नाही," ओंकार आणि गंधार नकारार्थी माना हलवत राहिले.

"खूप वर्षांपूर्वी १६ आणे म्हणजे १ रुपया असे कोष्टक होते. हे मला फक्त वाचून, ऐकून, माहिती आहे. नाही म्हणायला २५ पैशाला ४ आणे आणि पन्नास पैशाला आठ आणे असे तुझ्यासारखे मोठे लोक नेहमी म्हणताना ऐकलंय." वैभवने विचारपूर्वक सांगितले.

"शेतात उत्तम पीक आलं ना तर सोळा आणे पीक आलंय असं कौतुकानं सांगितलं जायचं. यावर्षी अवेळी पावसाने 'आणे' कसलं 'उणे' पीक आलंय. म्हणून तर महागाई वाढलीय," आजी सोळा आणे खरं बोलली.

"सोळा मात्रांचा त्रिताल मला माहिती आहे गं. नृत्यात आणि गाण्यात याचा खूप वापर केला जातो," रतीने धाधिं धिं धा धाधिं धिं धा करत हातावर ताल पकडला

"आजी, मी नवीन कॅलेंडर लावू का ग?" गंधारला घाई झाली होती.

"अरे थांब, अजून चार दिवस बाकी आहेत," रतीने त्याला थांबविले .

"तोपर्यंत तुम्हा सर्वांना इंग्रजी नवीन वर्षाच्या शुभेच्छा खूप अभ्यास करण्याचा संकल्प सोडा, म्हणजे सोळा आणे यश पदरात पडेल. खरं ना!"

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्या परिषद)

इयत्ता : आठवी

---

**प्रश्न :**

१) वरील उताऱ्यात कोणकोणत्या व्यक्तींचा उल्लेख आला आहे?

२) ओंकार - गंधार यांचे काय नाते असेल?

३) सोळा आकडा म्हटल्यावर उताऱ्यात कोणकोणत्या गोष्टींचा उल्लेख आला आहे?

४) ‘संकल्प सोडणे’ म्हणजे काय? तुला कोणता संकल्प सोडवा असे वाटते?

५) वैभवला कोणते कोष्टक वाचून, ऐकून माहिती होते?

६) कॅलेंडरला मराठीत कोणता शब्द आहे?

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद
(विद्या परिषद)
इयत्ता : आठवी

---

मजकुराचा प्रकार :- **प्रतिसाद**

## छोटे शहर सुखी शहर

शहराची ‘वाढ’ अवास्तव होत आहे व शहरे फुगतच चालली आहेत. याला कारण आपण शहरांच्या वाढीवरच लक्ष केंद्रित केले व खेड्यांना दुर्लक्षित ठेवले. अशा परिस्थितीत लोकसंख्येचा ताण शहरांवर असह्य होत गेला. व सार्वजनिक वाहतूक, पर्यावरण, वीज, पाणी अशा मूलभूत गोष्टींना आपण दुरावत चाललो आहोत आणि स्थानिक स्वराज्य संस्था या गोष्टींसाठी कमी पडतात. गांधीजी म्हणत ‘खेड्यांकडे जा’; पण गांधीजींचे ऐकतो कोण! आणि अपुऱ्या अवस्थेत ‘स्मार्ट’ सिटी करणे शक्य आहे काय? छोटे कुटुंब; सुखी कुटुंब या म्हणीप्रमाणे ‘छोटे शहर, सुखी शहर’ याचा पुरस्कार केला गेला पाहिजे. खेडी-सुधारयोजना आखली तर असंख्य लहान-लहान टुमदार शहरे निर्माण होतील व लोक मोठ्या शहरांकडे पळणार नाहीत. थोडक्यात म्हणजे सर्वांगीण विकास साधला जाईल. तेव्हा छोट्या शहरांचा पुरस्कार व्हायला हवा.

शुधांशू पंत
नागपूर

**प्रश्न :**

१) शहरांमध्ये कोणत्या मूलभूत सुविधा दुरावत चालल्या आहेत?
२) ‘छोटे शहर, सुखी शहर’ या योजनेबद्दल तुमचे मत लिहा.
३) गांधीजींनी कोणता संदेश दिला?
४) खेड्यात करता येतील असे कोणतेही दोन बदल सुचव.

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्या परिषद)

इयत्ता : आठवी

---

मजकुराचा प्रकार :- **बातमी**

**<u>ज्येष्ठ नागरिकांना विद्यार्थ्यांकडून 'मायेची ऊब'</u>**

अमरावती, ता.८ : महाराष्ट्र हौसिंग बोर्ड येथील 'ज्ञानमंदिर' प्रशालेतील विद्यार्थी गेली दहा वर्षे वाढदिवसाचा खर्च वाचवून हिवाळ्यात अनाथ, वयोवृद्धांना ब्लांकेटचे वाटप करतात. दरवर्षी विद्यार्थी यासाठी प्राचार्यांकडे रक्कम जमा करतात. वर्षभरात जमा झालेल्या रकमेत तेवढ्याच रकमेची भर घालून संस्थेचे अध्यक्ष ब्लांकेट खरेदी करतात आणि वयोवृद्धांना वाटप करतात.

या संदर्भात प्रशालेचे प्राचार्य म्हणाले, "विद्यार्थ्यांवर समाजसेवेचा संस्कार करण्यासाठी व सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी अनाथांना व वयोवृद्धांना थंडीत आम्ही विद्यार्थ्यांमार्फत ब्लांकेटचे वाटप करतो. गेली दहा वर्षे विद्यार्थी आपला वाढदिवस घरी साजरा न करता शाळेत साजरा करतात. एक रुपयापासून ते शंभर रुपयांपर्यंतची रक्कम शाळेत जमा करतात. तेवढीच रक्कम संस्थेचे अध्यक्ष त्यामध्ये घालतात व ब्लांकेट खरेदी करतात."

यावर्षी शाळेने दीडशे ब्लांकेटची खरेदी केली. थंडीत कुडकुडणाऱ्या आजी - आजोबांना ब्लांकेट दिले आणि मायेची ऊब देण्याचा प्रयत्न केल्याचे प्राचार्यांनी सांगितले.

**प्रश्न -**

१) 'ज्ञानमंदिर शाळेचे विद्यार्थी गेली दहा वर्षे वाढदिवस कसा साजरा करत आहेत ?

२) कोणत्या दोन गोष्टींचे संस्कार जपण्यासाठी शाळेचे प्राचार्य काम करीत आहेत ?

३) ब्लांकेट खरेदी करताना शाळेचा सहभाग कशा प्रकारचा आहे ?

४) मायेची ऊब देण्याचा प्रयत्न विद्यार्थ्यांनी कशाप्रकारे केला ?

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्या परिषद)

इयत्ता : आठवी

---

मजकुराचा प्रकार :- **विनोदी लेखन**

लेखक :- भारत सासणे

**ढमढेऱ्यांच्या पोटावर**

टुणटुण बेडकाला जमिनीवर न पडण्याचं वरदानच होतं जणू! घाबरुन त्यानं डोळे मिटले आणि त्याचं अध्यक्ष ढमढेऱ्यांच्या पोटावर अवतरण झालं. कोटाला गुलाबाचं फूल लावलेलं असावं तसा टुणटुण ढेरीवर बसून राहिला आणि ढमढेरे 'ओयेSS ओये SS' असं ओरडत एका पायावर नाचू लागले.

या ढमढेऱ्यांची गंम्मत अशी, की ते नेहमी कोणत्याही व्याख्यानात आणि अध्यक्षीय भाषणात आपण कसे निडर आहोत, निर्भय आहोत याची फुशारकी मारत. आता मात्र या ढमढेऱ्यांची अवस्था मोठी मजेची झाली होती. चक्क एक हिरवा पिवळा मोठा बेडूक ढेरीवर? तोही 'डरा S व' म्हणतोय आणि मोठ्या डोळ्यांनी रोखून पाहतोय? त्यांचे पाय लटपटू लागले. मग डमरू वाजवताना करतात, तशी डाव्या हाताची आणि मनगटाची हालचाल ढमढेरे करू लागले आणि तोंडानं 'फुस्सS फुर्रSS' असे आवाज काढायला लागले. देवेंद्रला त्यांना पाहून हसू येऊ लागलं. 'मोठे निर्भय म्हणवतात स्वतःला,' त्यानं मोठ्यानं म्हटलं.

पुन्हा लोकांची धावपळ आणि गडबड.

देवेंद्र पोट धरून हसू लागला टुणटुणनं ओळखलं, 'हा पोरगाच तेवढा धीट आहे. आपल्याला याच्यापासूनच धोका आहे आणि हा तर आपल्याकडेच येतोय. पुन्हा त्यानं तंगडी धरून भिरकावण्याआधी आपणच...' आणि मग टुणटुणनं शक्ती पणाला लावून उडी मारली, टुणण!! आणि समोरच खिडकी होती!

**प्रश्न :-**

१) ढमढेऱ्यांचे पाय का लटपटू लागले ?

२) ढमढेरे कशाची फुशारकी मारत ?

३) टुणटुणनं उडी का मारली ?

४) देवेंद्र पोट धरून हसू का लागला?

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद
(विद्या परिषद)
इयत्ता : आठवी

---

मजकुराचा प्रकार - **व्यक्तिचित्र**

संदर्भ :- निवडक किशोर

लेखक :- किशोर मोरे

**गाडगेबाबा**

लोक देवभोळे. अंधश्रद्धाळू!.. गावाबाहेर शेंदूर फासलेले दगड असायचे. ती ‘मरीमाता’. कुणाला ताप भरला तर मरीमाता कोपली अशी समजूत. मग त्यासाठी कोंबडे - बकरे कापा. बळी द्या. रक्ताचे पाट वाहिले, की देवी पावणार. रोग्याचा ताप उतरणार. अशा खुळचट रूढी. पिढ्यान् पिढ्या चालत आलेल्या.

एकदा गावकऱ्यांनी खड्डा खोदला. बाजूला रेडा बांधून ठेवला होता. तो कापून देवीला वहायचा होता. रेड्याची पूजा सुरू होती. एवढ्यात एक धिप्पाड पुरूष गर्दीतून तीरासारखा आला. त्या खड्ड्यात उतरला आणि वाघासारखा गर्जून म्हणाला, “रेड्याच्या आधी माझ्या मानेवर सुरी चालवा. मुक्या जीवाची हत्या मी होऊ देणार नाही.”

ते होते डेबूजी... गाडगेबाबा...

डेबूजी सतत उद्योगात मग्न असायचा. दिवसा शेतीत मेहनत, रात्री भजन - कीर्तन! उरलेल्या वेळात लोकहिताची कामे. भोवतालच्या जगाचे निरीक्षण करत होता.

दरवर्षी तो यात्रेला जायचा. यात्रेत गर्दी व्हायची. लोक घाण करायचे, त्यामुळे रोगराई वाढायची. डेबूजी ही घाण निपटून काढायचे. कचरा दूर नेऊन टाकायचे. डेबूजीने आधी लोकांना स्वच्छता शिकवली. खराट्याचा मंत्र दिला. कीर्तनातून लोकशिक्षणास प्रारंभ केला.

अंगात रंगीबेरंगी चिंध्यांचा सदरा. खाली लुंगी, हातात काठी आणि खराटा. डोक्यावर गाडग्याची ‘हॅट’! लोक त्यांना गाडगेबाबा म्हणू लागले. त्यांची कीर्तने ऐकण्यासाठी गर्दी करू लागले. कीर्तनाच्या सुरुवातीला श्रोत्यांना दोन्ही हात वर करून टाळ्यांच्या तालावर भजन करायला सांगायचे, ‘गोपाला - गोपाला - देवकीनंदन गोपाला.’ हा गजर चालायचा. श्रोते तल्लीन होऊन डोलू लागले, की बाबांच्या वाणीचा प्रवाह सुरू व्हायचा. बाबा कीर्तनात रोजच्या

---

व्यवहारातील उदाहरणे द्यायचे, प्रश्नोत्तरांच्या तंत्रामुळे श्रोते सहभागी व्हायचे आणि बाबांचा उपदेश त्यांच्या मनावर ठसायचा. ते सांगायचे - मुलांना शिकवल्याशिवाय राहू नका आईबापांची सेवा करा. जातिभेद पाळू नका. दारू पिऊ नका. बोला, “गोपाला - गोपाला - देवकीनंदन गोपाला.”

**प्रश्न -**

1) लोक कसे होते?
2) कोणत्या रुढी पिढ्यान् पिढ्या चालत आलेल्या होत्या?
3) “मुक्या जीवाची हत्या मी होऊ देणार नाही”, असे कोण म्हणाले? का?
4) यात्रेचे स्वरूप दरवर्षी कसे होते?
5) डेबूजींनी कोणती शिकवण लोकांना दिली? कशाप्रकारे?
6) डेबूजींचा पोषाख कसा असायचा?
7) आपल्या कीर्तनातून कोणता संदेश ते लोकांच्या मनावर ठसवायचे?
8) कीर्तन चालू असताना कोणता गजर होत असायचा?
9) वरील उताऱ्यातील दोन उदाहरणांमधून तू स्वतः कोणकोणत्या गोष्टी शिकलास?

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद
(विद्या परिषद)
इयत्ता : आठवी

---

मजकुराचा प्रकार - **व्यक्तिचित्र**

संदर्भ :- माणदेशी माणसं

लेखक :- व्यंकटेश माडगूळकर

**तांबोळ्याची खाला**

आमच्या पलीकडच्याच खोलीत खाला तांबोळीण राहत होती. एकटीच. त्या टीचभर खोलीत तिचा गाडग्यामडक्यांचा संसार होता.

रंगानं काळीसावळी, ठेंगणी आणि अंगानं चांगली भरलेली, ही म्हातारी मोठी जहांबाज बाई होती. तिच्या अंगावर कधी हलकं मळकं लुगडं दिसलं नाही. कानात कुड्या, हातात अंगठी, पदर डोक्यावरून ओढून घेऊन आणि निऱ्यांचा घोळ हातात धरून ती दाणदाण चाले आणि बोलायला लागली म्हणजे लाह्या उडाव्या तशी बोले. तशी आमची तिची फारशी घसट नव्हती. कुंकू - दातवणाचा व्यापार करणारी ती एक तांबोळीण आहे एवढं माहीत. बरं आठवड्यातून चार दोन दिवसच ती घरी असायची.

एकदा संध्याकाळी मिणमिणत्या प्रकाशात बसून माझा मित्र वसंता बासरी वाजवीत होता. एवढ्यात तिकडून खाला ओरडली - “बेटा, बंद कर रं तुजी बासरी. राती वाजवू नये!”

“चांगली विंग्रजी बुकं पढलेली पोरं तुम्ही. काय रं सांगायचं तुम्हाला? बोडक्या बायकांनी ऐकू नये बासरी!”

खालानं सांगितलेला हा संकेत आम्हाला माहीत नव्हता. “किती उखणली रं खोली. थांब उद्या सकाळी घेते ओरबाडून, उघडी ठेवून जावा साळंत.”

सकाळी खाला वरावरा हिंडून पाटीभर शेण घेऊन आली आणि आमची खोली तिनं चकपक करून दिली.

वयस्कर झालेली ही बाई एखाद्या मधमाशीसारखी कष्टाळू होती. काही ना काही उद्योग करणारी. आठवड्याच्या बाजारात कुंकू, हळद, बुक्का, दातवण, शेंगदाणे, फुटाणे असले जिन्नस

---

पुड्यांत घेऊन बसे. एवढंच तिचं भांडवल. ते दुकान मोकळं झालं की, ती आपल्या घरकुलात येई. वारीचे दिवस आले म्हणजे रद्दी आणि दातवणाची पाटी घेऊन ती रस्त्याला बसे.

खालाच्या या छोट्या दुकानाचा भरपूर फायदा आम्ही घेत असू. भूक लागली की जावं आणि म्हणावं, “खाला शेंगदाणे दे”, की हातातलं काम टाकून खाला उठे.

खालाला कुणी नव्हतं. ना नात्यागोत्याचं, ना मायेचं! ती धडपडत होती, श्रमत होती. चार माणसांशी गोड बोलून राहत होती. जगात केवढ्या घडामोडी होऊन राहिल्या होत्या पण खालाला कशाची दाद नव्हती.

खालाचं हे जीवन त्याच दिशेनं संथपणे जात असलेलं मी तीन वर्षे पाहिलं. आणि त्यानंतर मी परगावी गेलो.

**प्रश्न -**

1) खाला तांबोळीण कोणता उद्योग करायची?
2) खाला तांबोळीण कशी दिसायची याचे कसे वर्णन केले आहे?
3) खाला तांबोळीण कष्टाळू होती हे कशावरून दिसून येते?
4) खालाने सांगितलेला कोणता संकेत त्या मित्रांना माहीत नव्हता?
5) ‘म्हातारीने शेजारधर्म पाळला’ हे कोणत्या कृतीतून दिसून येते?
6) खाला तांबोळणीचा संसार कसा होता?
7) वरील उतारा वाचून तुला खाला तांबोळणीची कोणती स्वभाववैशिष्ट्ये लक्षात येतात ते लिही.

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्या परिषद)

इयत्ता : आठवी

----------------------------------------------------------------------------------------------------

मजकुराचा प्रकार - **व्यक्तिचित्र**

संदर्भ :- निवडक किशोर

लेखक :- अनिल शिंदे

**झाकीर**

आज बडे बडे कलावंत त्याची साथ घेण्यासाठी उत्सुक असतात, कारण त्याच्या साथीमुळे त्यांच्या कलेला वेगळाच बहार येतो. ते सितारवादक पंडित रविशंकर असोत वा संतूरवादक पंडित शिवकुमार शर्मा असोत वा विख्यात नर्तक बिरजू महाराज असोत किंवा बासरीवादक हरिप्रसाद चौरसिया असोत. या सर्वांना तो सारख्याच दमानं, ताकदीनं नि कलापूर्ण रितीनं साथ करतो. त्याची बोटं त्या अरुंदमुखी तबल्यावर थिरकू लागतात, एवढी पराकोटीची परिपूर्णता या कलाकारानं मिळवली आहे.

घरातील परंपरा, असामान्य गुरूकडून मिळालेले विपुल ज्ञान, स्वत: अथक नि सातत्यपूर्ण केलेले परिश्रम यांच्या त्रिवेणी संगमातूनच ही परिपूर्णता आली आहे. या कलाकाराचं नाव अर्थातच तबलानवाज “झाकीर हुसेन!”

झाकीरचे पिता उस्ताद अल्लारखाँ यांनीच प्रथम हुसेन घराण्यात तबला आणला आणि त्यांच्याकडून झाकीर हुसेन यांना तबलावादनाची दीक्षा मिळाली

वयाच्या अगदी तिसऱ्या वर्षापासूनच झाकीर अल्लारखाँ बरोबरसंगीत मैफिलींना जाई, त्यांच्यामागे बसून एकचित्तानं ऐके. यामुळंच मग मैफिलीचे ज्ञान, ती कशी जिंकायची, हे तो नकळत आत्मसात करत होता.

वयाच्या अवघ्या सातव्या वर्षी झाकीरनं पहिल्या जाहीर मैफिलीत भाग घेतला आणि त्यात त्यानं साथसंगत सरोदवादक अली अकबर खाँ यांनाकेली. त्यानं भारतात सर्वत्र नाव गाजवलं. हा खरा तबलानवाज!

झाकीरनं बालवयातले संस्कार कायम जपले. आज आपल्या पित्याला आपला आभिमान वाटतो यानं त्याची छाती फुगते. आज त्याच्या सारखा तबलानवाज नाही, पण म्हणून तो गर्वानं कधी फुगलेला नाही. वयाच्या सदतिसाव्या वर्षी त्याला पद्मश्री मिळाली, तेव्हा तो एका

---

मैफिलीत तबला वाजवत होता. पंडित रविशंकरही होते, त्यांनीच तिथं ही घोषणा केली. त्यावेळी तो अधिकच विनम्र बनला, भारावला, पुढे गेला नि त्यानं प्रथम उपस्थित असलेल्या सर्व ज्येष्ठ कलाकारांना वाकून नमस्कार केला.

**प्रश्न -**

1) झाकीर हुसेन यांनी कोणाकोणाला साथ केली होती?
2) झाकीर हुसेन यांच्या तबलावादनाला कशामुळे परिपूर्णता आली?
3) झाकीर हुसेन यांच्या पित्याचे नाव काय?
4) वयाच्या सदतिसाव्या वर्षी त्यांना कोणता बहुमान मिळाला?
5) झाकीर हुसेन यांची पहिली मैफिल केव्हा झाली? त्यावेळी त्यांनी कोणत्या कलाकाराला साथ केली?
6) 'एवढे मोठे कलावंत पण अतिशय विनम्र' हे कोणत्या प्रसंगावरून लक्षात येते?
7) तुला माहीत असलेल्या आणखी दोन प्रसिद्ध वादकांची नावे लिही. (तुझ्या शाळेतील/गावातील वादकांची नावे लिहिलीस तरी चालेल)